# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रो. (डॉ.) सदानंद भोसले

एम्.ए., पीएच् डी.

संचालक (अतिरिक्त कार्यभार)

कार्यालय क्र. : ०२०–२५६२२६८८/८९
: ०२०–२५६२२६९०/९१
: ०२०–२५६२२६९२
: ०२०–२५६९७३४१


**संदर्भ : रासेयो/२०२४–२५/४७३** **दि.०५/०२/२०२५**

**प्रति,**

**मा. प्राचार्य/संचालक/विभागप्रमुख,**

**संबधित महाविद्यालये/विभाग/परिसंस्था**

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**

**पुणे, अहिल्यानगर व नाशिक जिल्हा**

**विषय : 'उत्कर्ष : २०२४–२५' सांस्कृतिक स्पर्धा निवडचाचणी शिबिराबाबत**

महोदय/महोदया,

मा. राज्यसंपर्क अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय कक्ष, महाराष्ट्र शासन, मुंबई यांनी पाठविलेल्या पत्रानुसार सन २०२४–२५ वर्षात **'उत्कर्ष' राज्यस्तरीय सामाजिक व सांस्कृतिक** स्पर्धेचे आयोजन **सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथे दि. २३ ते २५ फेब्रुवारी, २०२५** दरम्यान करण्यात येणार आहे. सदर **'उत्कर्ष' राज्यस्तरीय सामाजिक व सांस्कृतिक** स्पर्धेत महाराष्ट्रातील विद्यापीठांमधून प्रत्येकी १८ विद्यार्थ्यांचा संघ सहभागी होतात. या स्पर्धेमध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजनेचा ९ स्वयंसेवक, ९ स्वयंसेविका व १ कार्यक्रम अधिकारी संघनायक याप्रमाणे १९ जणांचा संघ सहभागी होणार आहे. या स्पर्धेकरिता सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजनेच्या संघाकरिता निवडचाचणी शिबिराचे आयोजन **११/०२/२०२५** रोजी **संत नामदेव सभागृह, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे** या ठिकाणी करण्यात आले आहे. स्पर्धा निवडचाचणी खालील प्रकारात घेतली जाईल.

१. **नृत्य** : **संकल्पना नृत्य** (Creative Dance), **(रासेयो संकल्पनेवर आधारित)**
२. **संगीत** : **समूहगीत, ताल/सूर/लोकवाद्य वादन, भारतीय लोककला – पोवाडा, भारूड, भजन इ.**
३. **साहित्य** : **निबंध, वक्तृत्व, कविता**
४. **नाट्य** : **पथनाट्य, एकपात्री अभिनय**
५. **ललितकला** : **भित्तीचित्र घोषवाक्यासहित**
६. **छायाचित्रण**

वरीलप्रमाणे **'उत्कर्ष'** या सांस्कृतिक स्पर्धेच्या निवडचाचणी शिबिराकरिता **https://forms.gle/nyVhiXsbSUXcYx6v9** गुगल फॉर्मद्वारे आपल्या महाविद्यालयातील वरीलप्रमाणे कलाप्रकारात प्राविण्य असणाऱ्या स्वयंसेवकांची नावनोंदणी **दि. ८ फेब्रुवारी, २०२५** रोजी, दुपारी ३.०० वाजेपर्यंत करण्यात यावी. तसेच या गुगल फॉमद्वारे **नावनोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांना निवड चाचणी शिबिराकरिता दि. ११ फेब्रुवारी, २०२५** रोजी **स. १०.००** वाजेपर्यंत **संत नामदेव सभागृह, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे** याठिकाणी वरील प्रमाणे कलाप्रकाराच्या संपूर्ण तयारीने पाठवावे, सदर निवड चाचणी शिबिरातून निवड झालेल्या विद्यार्थ्यांना **दि. १३ ते २५ फेब्रुवारी, २०२५** दरम्यान विद्यापीठामध्ये आयोजित सराव शिबिरामध्ये व प्रत्यक्ष स्पर्धेमध्ये सहभागी होणे आवश्यक आहे. याबाबतची पूर्वकल्पना संबधित विद्यार्थ्यांना देण्यात यावी. निवड चाचणीकरिता महाविद्यालयाने स्वयंसेवकांचा महाविद्यालय ते विद्यापीठ व परत महाविद्यालय असा प्रवासखर्च नियमित कार्यक्रमातून करावा. कळावे, ही विनंती.

**संचालक**
**राष्ट्रीय सेवा योजना**

१. *निवडचाचणीकरिता स्पर्धेमध्ये विशेष प्राविण्य असणाऱ्या स्पर्धकांना सोबत घेऊन कार्यक्रम अधिकारी यांनीच सदर गुगल फॉर्म भरण्यात यावा.*
२. रासेयो वर्धापन दिन–२०२४ आयोजित जिल्हास्तरीय स्पर्धेतील विजेते/विद्यापीठस्तरीय स्पर्धेतील सहभागी स्पर्धकांना प्राधान्य देण्यात यावे.


**Website :** http://www.unipune.ac.in/nss **Email :** nss@pun.unipune.ac.in, nss@unipune.ac.in